

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार महापालिकेच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन ! e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 06/02/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 40 ‖ RNI - MAHMAR/2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# शासकीय कार्यालयामध्ये सौरऊर्जा वापराकडे लक्ष द्या - उपमुख्यमंत्री पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : केंद्र व राज्य शासनाच्या अक्षय ऊर्जा निर्मिती संदर्भात सर्व जिल्ह्यांनी सकारात्मकतेने काम करावे. जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्यामध्ये शाळा, कार्यालयांच्या सौर ऊर्जे संदर्भात प्रस्तावाचा समावेश करावा, अशी सूचना उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज येथे केली.



उपमुख्यमंत्री कार्यालय मंत्रालय मुंबई येथून सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा वार्षिक योजना (डीपीसी) संदर्भातील राज्यस्तरीय ई – बैठक घेण्यात आली. या बैठकीला मंत्रालयातून इतर मागास बहुजन कल्याण,पशुसंवर्धन,अपारंपारिक ऊर्जामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांची उपस्थिती होती तर वित्त नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, नवी दिल्लीवरून खासदार अशोक चव्हाण, अप्पर मुख्य सचिव राजगोपाल वर्मा, वित्त व नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी ई-उपस्थित होते. तर नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातून आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, सहाय्यक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे व सर्व विभाग प्रमुखांची ई -उपस्थिती होती.

यावेळी लोकप्रतिनिधींनी गाव तिथे स्मशानभूमी, पानंद रस्ते, शाळांची दुरुस्ती, मराठवाडा मुक्ती संग्राम कार्यक्रमांसाठी वाढीव निधी, माळेगाव यात्रा, जलजीवन मिशन, नव्या रोहित्रांसाठी वाढीव निधी, तसेच शाळा व सर्व शासकीय कार्यालयांवर सोलर सिस्टम बनविण्याबाबतची मागणी केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाला समजून घेतले. उपस्थित लोकप्रतिनिधींच्या प्रारूप आराखड्यासंदर्भातील मतांना लक्षात घेतले. मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीमध्ये नांदेड जिल्ह्याच्या अंतिम आराखड्याला मान्यता देण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले.

# राज्यपालांच्या हस्ते 64 व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाचे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयातर्फे आयोजित ६४ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाचे उद्घाटन (कलाकार विभाग २०२४ – २५) राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ४ ) जहांगीर कलादालन येथे पार पडले.

यावेळी ज्येष्ठ अमूर्त चित्रकार लक्ष्मण श्रेष्ठ यांना राज्यपालांच्या हस्ते वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाच लाख रुपये, शाल, श्रीफळ व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शकुंतला कुलकर्णी यांना ज्येष्ठ कलाकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कला हा इतर प्रत्येक विषयाला समृद्ध करणारा विषय आहे. कला विषयामुळे जाणिवा विस्तारतात, त्यामुळे वैद्यकीय शिक्षण, अभियांत्रिकी अथवा इतर व्यावसायिक शिक्षणाला कलेची जोड दिली गेली पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार अशा प्रकारे कला विषय निवडण्याचा अधिकार विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याला चित्रकला, स्थापत्यकला व वास्तू निर्माण कलेचा मोठा वारसा लाभला आहे. शिवकालीन गडकिल्ले, भित्तिचित्रे व शिल्पकलेचा देखील वारसा राज्याला लाभला आहे.



अशा कला संपन्न राज्यात कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिक प्रदर्शने आयोजित केली जावी तसेच कलाकारांना दिली जाणारी बक्षीस राशी वाढवली जावी, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार महापालिकेच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात उभारण्यात आलेल्या विविध विकासकामांचा उद्घाटन, भूमीपूजन तसेच उपक्रमांचा लोकार्पण सोहळा राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ६ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२ वाजता जाधववाडी, चिखली येथील एमएनजीएल पंपासमोर आयोजित करण्यात आला असल्याची माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे.



या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या विशेष उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह खासदार, आमदार आणि महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

भूमीपूजन होणाऱ्या प्रकल्पांमध्ये पिंपरी येथील सुविधा भुखंडावर उभारण्यात येणारे मध्यवर्ती अग्निशमन केंद्र आणि अग्निशमन प्रबोधिनी इमारत, आकुर्डी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवन जवळ उभारण्यात येणारे अग्निशमन केंद्र, मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड (२४ मीटर डी.पी रस्ता) व सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड (१८ मीटर डी.पी रस्ता) तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या वाकड शिवेपर्यंतचा १८ मीटर रुंदीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण तसेच पवना नदीवरील मामुर्डी ते सांगवडे दरम्यान जोडणारा पूल या विकासकामांचा समावेश आहे.लोकार्पण होणाऱ्या विकासका उपक्रमांमध्ये स्मार्ट सिटीच्या वतीने GIS Enabled ERP अंतर्गत Core Application (SAP), Non-Core Application, E-office (DMS) आणि भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) मध्ये विकसित केलेली संगणक प्रणाली तसेच चिंचवड येथील तालेरा रुग्णालयाची नवीन इमारत, शहरातील विविध ठिकाणी टाकाऊपासून टिकाऊ (वेस्ट टू वंडर) वस्तूंपासून निर्मिती केलेल्या टिकाऊ कलाकृती, महापालिकेच्या विविध प्रशासकीय इमारतींवर बसविण्यात आलेले रुफ टॉप सोलर सिस्टीम (सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प), सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन (CHDC) उपक्रम, AI Driven Hoarding Detection and Surveillance System उपक्रम यांचा समावेश आहे.

# निरंकारी संत समागम मैदानामध्ये मिशनच्या माध्यमातून विशाल वृक्षारोपण संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पृथ्वीवरील ग्लोबल वार्मिंगच्या वाढत्या समस्येच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपणाचे महत्त्व अधिकाधिक वाढले आहे. २०२० पासून कोरोनाच्या संकटाने निसर्गाची अमूल्य देणगी, प्राणवायू अर्थात ऑक्सिजनचे महत्त्व समजून दिले आहे. त्याचबरोबर, या वायूच्या कमतरतेमुळे होणारे दुष्परिणाम सुद्धा अधोरेखित झाले आहेत. मानवजातीचे जीवन प्राणवायू वर आधारित आहे, जो मुख्यत: वृक्षांमधून मिळतो. त्यामुळे वृक्षांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे, तसेच आपल्या जीवनासाठी देखील अत्यंत महत्त्वाचे आहे.

सतगुरु माताजींनी समाजामध्ये एकात्मता कायम टिकवणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि मानवतेची सेवा करणे हेही भक्तिचे अभिन्न अंग आहे आणि जीवनात भक्तीला सदैव प्राथमिकता द्यायला हवी असे उद्गार महाराष्ट्राच्या ५८ व्या वार्षिक निरंकारी संत समागमामध्ये विशाल जनसमुदायाला संबोधताना मांडले होते, त्या उक्तीतून प्रेरणा घेऊन रविवार, २ फेब्रुवारी २०२५ रोजी, पिंपरी येथील डेयरी फार्म, शास्त्रीनगर येथील संत निरंकारी समागम मैदानावर वृक्षारोपणाचा एक भव्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात ५००० हून अधिक




वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी नगरसेवक संदीप वाघेरे, पुणे झोन प्रमुख ताराचंद करमचंदानी, पिंपरी क्षेत्रीय संचालक किशनलाल अडवाणी, पुणे क्षेत्रीय संचालक अवनीत तावरे यांसह संत निरंकारी मंडळाचे अनेक मान्यवर उपस्थित होते.

संत निरंकारी मिशनने ऑगस्ट २०२१ मध्ये पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने 'वननेस वन' या अभिनव प्रकल्पाची घोषणा केली. या प्रकल्पांतर्गत वृक्षरोपण तसेच वृक्षांची देखभाल करणे हाही उद्देश होता. पुणे परिसरातील खुटबाव, पाषाण, औंध आणि कोरेगाव मूळ याठिकाणी देखील अशाच प्रकारचे वृक्षारोपण केले गेले आहे. मिशनतर्फे यापुढे त्या सर्व वृक्षांची नियमित देखभाल देखील केली जात आहे.

संत निरंकारी मिशन पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अनेक कल्याणकारी उपक्रम राबवित आहे. यामध्ये वृक्षारोपण मोहीम, रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, जलसंधारण प्रकल्प तसेच पर्यावरणविषयक समस्यांबद्दल जनजागृती या उपक्रमांचा समावेश आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 06/02/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# स्थायी समितीच्या बैठकीत विविध विषयक कामांना मान्यता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : आकुर्डी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवनजवळ अग्निशमन केंद्र उभारणे तसेच मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड (२४ मीटर डी.पी रस्ता) व सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड (१८ मीटर डी.पी रस्ता) तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या वाकड शिवेपर्यंतचा १८ मीटर रुंदीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे अशा विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिली.स्थायी समिती आणि महापालिका सभेची मान्यता आवश्यक असलेले विषय प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी आज झालेल्या बैठकीत ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.शहरातील सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करणे तसेच जीव आणि मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी पुरेशा अग्निसुरक्षा सेवेची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आकुर्डी येथील हेडगेवार भवनजवळ अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे. या कामासाठी ३० कोटी ६४ लाख रुपये इतकी निविदा रक्कम निश्चित करण्यात आली असून कामाची मुदत १८ महिने इतकी आहे. या इमारतीमध्ये १० मजले असून एकूण ६ अग्निशमन बंबाची व्यवस्था करण्यात येणार आहे. आगीच्या घटनांमध्ये होणाऱ्या जिवीत व वित्त हानीला रोखण्यासाठी तसेच या आपत्कालीन परिस्थितीला तत्परतेने सामोरे जाण्यासाठी



हे केंद्र महत्वाचे ठरणार आहे. या अग्निशमन केंद्राच्या उभारणीस येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये मान्यता दिली.मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड या २४ मीटर रूंद आणि १४२० मीटर लांबी असलेल्या तसेच सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड या १८ मीटर रुंद आणि ११२० मीटर लांबीच्या रस्त्याचे तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या वाकड शिवेपर्यंतच्या १८ मीटर रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामासाठी ५८ कोटी ४५ लाख रुपये इतका खर्च होणार असून या कामाची मुदत ३० महिने आहे. या प्रकल्पाअंतर्गत सुरक्षित पदपथ, सुनियोजित पार्किंग, पावसाळी पाण्याचा योग्य निचरा करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय रस्ता दुभाजक आणि सायकल ट्रॅक देखील तयार केले जाणार आहे. यामुळे आरामदायी प्रवास व दळणवळणास मदत मिळणार असून वाहतुक कोंडी कमी होऊन नागरिकांच्या इंधनाची बचत होण्यास मदत मिळणार आहे. या प्रकल्पास येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या स्थायी समिती सभेत मंजुरी दिली.

# KBC ज्युनियरमध्ये प्रनुशा थामके झळकली

## अमिताभ बच्चनने लहानपणीच्या आठवणी शेअर केल्या

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

या आठवड्यात, कौन बनेगा करोडपती या लोकप्रिय ज्ञान-आधारित गेम शोमध्ये KBC ज्युनियर्स म्हणून 8 ते 15 वर्षे या वयोगटातील हुशार मुले स्पर्धक म्हणून येणार आहेत. ही मुले आपली हुशारी दाखवतील आणि थरारक आव्हानेही पेलताना दिसतील. या सगळ्या डोकेबाज मुलांमध्ये प्रनुशा थामके ही विदर्भातून आलेली सहावीत शिकणारी एक बेधडक आणि प्रसन्न मुलगी देखील आहे. होस्ट अमिताभ बच्चन यांच्याशी तिने खूप गप्पा मारल्या. आपल्या माता-पिता आणि बहिणीसह या कार्यक्रमात आलेली प्रनुशा अत्यंत निर्धाराने हॉटसीटवर विराजमान झाली. गेम हळूहळू रंगत असताना या छोट्या मुलीने श्री. बच्चन यांच्याशी एक हलका फुलका क्षण शेअर केला. स्वतःची ओळख तिने 'सुपरपॉवर बाथरूम सिंगर' अशी करून दिली. आपल्या शैलीत तिच्याशी बोलताना श्री. बच्चन म्हणाले, "या जगात असे कुणीच नसेल, जो बाथरूम सिंगर नसेल." यातून गप्पांना एक रोचक वळण मिळाले. त्यावेळी बिग बींनी त्यांच्या परिचयाच्या एका गायकाचा किस्सा सांगितला. "एक गायक आहे, जो गावात राहतो. त्याला गायला खूप आवडायचे. तो ट्रॅक्टर चालवायचा आणि त्याच्या सुरात सूर मिळवून गात राहायचा." आठवणींच्या ओघात श्री. बच्चन यांनी लहानपणीचा एक धाडसी किस्साही सांगितला. ते म्हणाले, "गार हवेसाठी आम्ही आमच्या टेबल फॅनच्या पुढ्यात बर्फाचे तुकडे ठेवायचो. काही वर्षांनी आमच्या घरी फ्रिज आला. तो उघडला तेव्हा आमच्या लक्षात आले की तो आतून गार गार आहे. आम्ही त्यावेळी लहान




होतो आणि एके दिवशी आम्ही फ्रिजमध्ये अडकलो आणि फ्रिजचे दार लॉक होऊन गेले." त्यानंतर त्यांनी हसत हसत सांगितले की, "आम्ही आरडाओरडा केला, तेव्हा कोणी तरी येऊन आम्हाला बाहेर काढले. गरमीतून वाचण्यासाठी आम्ही काहीही करायला तयार असायचो." जाता जाता त्यांनी प्रनुशाच्या छोट्या बहिणीला 'तू असे करू नकोस' असा खेळकर सल्लाही दिला. जे ऐकून प्रेक्षक खूप हसले. त्या चुणचुणीत मुलीनेही तत्काळ उत्तर दिले, "आमच्या फ्रिजचा अजून तसा वापर झालेला नाही." या भागात जिव्हाळा, हास्य आणि किश्श्यांची जी देवाणघेवाण झाली, त्यामुळे हा भाग नक्कीच अविस्मरणीय ठरणार आहे.

बघा कौन बनेगा करोडपती ज्युनियर्स, महान अमिताभ बच्चनसह सोमवार ते शुक्रवार रात्री 9 वाजता फक्त सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन आणि सोनी लिव्हवर!

# नवी सांगवीत बंगाली समाज बांधवांकडून सरस्वतीपूजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नवी सांगवी: मल्हार गार्डन येथे वसंत पंचमीनिमित्त बंगालीबांधवांकडून बुद्धीचीदेवता माता सरस्वतीची पूजान व होमहवन करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र शासन संजय गांधी निराधार योजनेचे संजय मराठे आणि भाजपा उपाध्यक्ष जवाहर ढोरे यांच्या हस्ते देवीच्या प्रतिमेची विधिवत पूजा करण्यात आले आणि भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

बंगाली समाजातील बांधव हे सरस्वती देवीचे नित्यनियमित पूजन करीत असतात.वर्षातील दोन दिवस



मूर्तीची मनोभावे प्रतिष्ठापना करतात पहिल्या दिवशी पूजा,होमहवन तर दुसऱ्या दिवशी देवीच्या मूर्तीचे विसर्जन करतात.माता सरस्वती देवी ही बुद्धीची देवता असून,बंगाली समाजातील प्रत्येक विद्यार्थी आपल्या शाळेतील पहिल्या दिवसाची सुरुवात सरस्वतीदेवीचे पूजनाने करीत असतात,अशी माहिती त्याप्रसंगी महाराष्ट्र शासन संजय गांधी निराधार योजनेचे संजय मराठे यांनी दिली.

या वेळी बेचू माल,सोमनाथ माल,पलाश माल,पिंटू पात्रा,सुबीर पात्रा,विश्वजित माझी,दुलाल दास,बिभूती बेरा,हेमंत आश,अजय दळवी,मिथुन दास,बिरबल तुरे,कौशिक करार,मिठू माल,श्रावंती माल,झुमा माल,दुर्गा पात्र,शिप्रा पात्रा,शिप्रा दास,संपा माझी,पंपा बेरा,झुंपा आश,शिवानी दळवी,सुभो पात्रा,बिनिता माल,पियुष माल,पुनीत पात्रा आदी मान्यवर व बंगाली समाजाचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बेचू माल यांनी केले तर आभार सोमनाथ माल यांनी मानले.

# पीसीपीच्या विद्यार्थ्यांची बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धेत हॅट्रिक

पिंपरी, पुणे (दि. ५ फेब्रुवारी २०२५) इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन, डी.१ झोन च्या वतीने विविध वैयक्तिक व सांघिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये बुद्धिबळ आणि कॅरम स्पर्धेत सलग तीन वर्ष विजेतेपद मिळवून हॅट्रिक केली. कॅरम स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड पॉलीटेक्निक (पीसीपी) मधील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. पीसीपीच्या संघाने या स्पर्धेत सलग तीन वर्ष विजेतेपद पटकावून हॅट्रिक साध्य केली. मुलींच्या संघाने कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले व बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

सौ. वेणुताई पॉलिटेक्निक, पुणे येथे झालेल्या मुलांच्या कॅरम स्पर्धेत विजेत्या संघांना प्राचार्य डॉ. एम. एस. जाधव, समन्वयक डी - १ झोनल हेडकॉटर वाय. एल. निंबाळकर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. द्वितीय क्रमांक मुलांच्या स्पर्धेमध्ये जी. पी. अवसरी संघाने मिळवला. अजिंक्य डी. वाय. पाटील लोहगाव, पुणे येथे झालेल्या मुलींच्या बुद्धिबळ व कॅरम स्पर्धेत विजेत्या व उपविजेता संघांना प्राचार्या डॉ. एफ. बी. सय्यद, पॉलीटेक्निक कॉर्डिनेटर एन. एल. शेळके व स्पोर्ट्स कॉर्डिनेटर अतुल हिवळे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. कॅरम स्पर्धेत द्वितीय क्रमांक मुलींच्या स्पर्धेमध्ये जी. पी. अवसरी संघाने मिळवला. तर चेस स्पर्धेत पहिला क्रमांक वाडिया कॉलेज पुणे यांनी मिळवला. यशस्वी विद्यार्थी व संघ व्यवस्थापक प्रा. संपत ननवरे, राजू गायकवाड, मारुती गायकवाड, प्रा. कोमल वाणी, प्रा. रेशमी ओव्हाळ, क्रीडा समन्वयक सुनील जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थरकुडे, प्राचार्या डॉ. विद्या बॅकोड यांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले.

# मद्यपान करण्यासाठी पैसे न दिल्याने युवकाचा खून

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : मद्यपान करण्यासाठी पैसे न दिल्याने युवकाचा खून करणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. भैय्या गमन राठोड (वय ३३, रा. पाटीलनगर, चिखली. मूळ रा. जळगाव) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी सुरज हनुमंत इंगळे (वय २९), मेहुल कैलास गायकवाड (वय २८), अजय अशोक कांबळे (वय २४, रा. पाटीलनगर, चिखली) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाटीलनगर चिखली येथे वन विभागाच्या जागेत भैय्या याचा रविवारी खून झाला. परिसरातील ५० ते ६० 'सीसीटीव्ही' कॅमेरे तपासले.

त्यानुसार आरोपींना चिखली मधून ताब्यात घेण्यात आले.

मद्यपान करण्यासाठी पैसे न दिल्याने खून केल्याची कबुली आरोपींनी दिली. भैय्या हा मागील तीन महिन्यांपूर्वी पिंपरी-चिंचवड शहरात कामासाठी आला होता. तर, अजय याच्यावर चिखली, पिंपरी आणि म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल आहेत.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 06/02/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# कृष्णानगर प्रभाग 11 येथे हळदी-कुंकू समारंभ संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चिखली: दरवर्षीप्रमाणे कृष्णानगर प्रभाग ११ मधील श्री गणेश मंदिर, महात्मा फुलेनगर येथे दिनांक ४ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हळदी-कुंकूवा मागील धारणा अशी आहे की प्रत्येक सुवासिनी ही साक्षात आदिशक्तीचे प्रतीक आहे. त्यांना हळद-कुंकू लावताना आपण त्यांच्या माध्यमातून देवीचे तत्त्व जागृत



करतो. यामुळे केवळ आध्यात्मिकच नाही, तर आपल्या घरात सकारात्मक ऊर्जा देखील निर्माण होते. या सोहळ्यामध्ये सुवासिनींना वाण देणे, उखाणे, गाणी, खेळ आणि गोडधोड पदार्थांचा आनंद घेतात .

हळदी कुंकू समारंभ हा हिंदू संस्कृतीचे जपणूक करणारा समारंभ आहे. या समारंभाच्या माध्यमातून महिला एकत्र येतात, हळदी कुंकू करतात, वाण लुटतात त्यामुळे त्यांची एकमेकींशी ओळख होते आणि स्नेह वाढतो. माणूसच माणसाच्या मदतीला धावून येतो. या झालेल्या ओळखीतून महिला एकमेकींना अडचणीत मदत करून पुढे जाऊ शकतात. आपणास काही अडचण जाणवली, समस्या जाणवली तर आवाज द्या मी नक्की तुमच्या अडचणी समस्या सोडवण्याचा प्रयत्न करेल असे सामाजिक कार्यकर्त्या मारुती जाधव म्हणाल्या .

सौ पूजाताई महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कीर्तीताई जाधव सखी मंच आयोजीत 'सौभाग्याचे लेणं' हळदीकुंकू समारंभ मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले . यावेळी सौ कीर्ती मारुती जाधव, मनीषाताई डोंगरे, मेघा देवकर, साई गौर, अंजली कांबळे, वंदना जाधव, वंदना कांबळे, महानंदा चौगुले, सारिका सोनवणे, प्रतिमा टोरपे, पूजा डुंबरे, सारिका आटवाल, जया जाधव, लक्ष्मी काळोखे,

यांच्यासह गावातील महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# देहूत जगद्गुरू संत तुकोबांच्या वंशजाची आत्महत्या!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

देहू : देहूत संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह.भ.प शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्या केली आहे. आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केल्याचा अंदाज आहे. या घटनेमुळे देहू गावावर शोककळा पसरली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरीष महाराज यांनी आज सकाळी साडेआठच्या सुमारास राहत्या घरी उपरण्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आर्थिक विवंचनेतून ही आत्महत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. २० फेब्रुवारीला त्यांचा विवाह होणार होता.



शिरीष महाराज मोरे यांनी नवीन घर बांधले होते. खालच्या मजल्यावर आई-वडील आणि वरच्या मजल्यावर ते राहत होते. मंगळवारी रात्री मोरे वरील खोलीत आराम करण्यासाठी गेले होते. सकाळी साडे आठ वाजल्यानंतरही ते खाली आले नव्हते. त्यामुळे घरातील सदस्य वरती गेले. दरवाजा वाजविला पण दार उघडले जात नव्हते. आतून प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे दार तोडण्यात आले. मोरे यांनी पंख्याच्या हुकाला उपरण्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी चिठ्ठी लिहून ठेवली आहे. दरम्यान, प्राथमिक दृष्ट्या आर्थिक विवंचेनेतून आत्महत्येचे केल्याचे कळत असल्याचे देहूरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे यांनी सांगितले. अधिक तपास देहूरोड पोलीस करीत आहेत. दरम्यान, हभप शिरीष मोरे महाराज यांच्या पार्थिवावर दुपारी चार वाजता वैकुंठ स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

शिरीष महाराज यांनी आत्महत्येपूर्वी चिठ्ठी लिहून ठेवली आहे. त्यात त्यांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला आहे. शिरीष महाराज हे संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज होते. तसेच त्यांचे निगडी येथे इडली उपहारगृह देखील होते. त्यांच्या पश्चात आई आणि वडील असा परिवार आहे. नुकताच त्यांचा टिळा झाला होता. २० फेब्रुवारीला रोजी मोरे यांचा विवाह होणार होता. आत्महत्येच्या घटनेमुळे देहूगावावर शोककळा पसरली आहे. घटनेचा अधिक तपास देहूरोड पोलीस करत आहेत.

# सैनिक कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, दि. ४: सैनिक कल्याण विभागामार्फत माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीरपत्नी, वीरमाता व वीरपिता यांना ऑनलाईन पद्धतीने आर्थिक मदतीचा लाभ घेण्याकरीता www.ksb.gov.in या संकेतस्थळावर नवीन ओळखपत्राकरिता नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सेवानिवृत्त सैनिकी अधिकारी, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीरपत्नी, वीरमाता व वीरपिता यांनी सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. नोंदणी केल्यानंतर कागदपत्रांसह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, बी. विंग, विधानसमोर पुणे- 1 येथे अर्जाची मूळ प्रत जमा करुन आपली माहिती अद्यावत करावी तसेच नवीन ओळखपत्रही प्राप्त करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल हंगे स.दै. (नि) यांनी केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 06/02/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पुण्यात 4 लाखाहून अधिक रुपयाचा मुद्देमाल जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, : राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या भरारी पथक क्रमांक १ च्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईत वानवडी आणि मोहम्मदवाडी हद्दीत छापा मारुन ४ लाख ८३ हजार ९५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त आला आहे.वानवडी हद्दीत लुल्लानगर चौक ते नेताजी नगर कॉलनी रोडच्या डाव्या बाजूला एक इसम महाराष्ट्र राज्यात विक्रीस, वाहतुकीस तसेच स्वतःजवळ बाळगण्यास प्रतिबंधित असलेल्या उच्च प्रतीचे विदेशी मद्य विक्रीच्या उद्देशाने पुरवठा करणार असल्याची माहिती भरारी पथक क्रमांक १ ला मिळाली त्यानुसार याठिकाणी राजकुमार उदा नारायण उपाध्याय यांच्या बॅगमधून ७५० मिली क्षमतेच्या विविध ब्रॅण्डच्या उच्च प्रतीचे विदेशी मद्याच्या एकूण ११ सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या.त्याच्या कडून चौकशीअंती



मिळालेल्या अधिक माहितीच्या आधारे दिपेश कुमार विजय कुमार सहा हा राहत असलेल्या धनश्री आशियाना सोसायटी ए विंग फ्लॅट नं. ७०१ मोहम्मदवाडी, येथे छापा टाकला असता राज्यात विक्रीस, स्वतः जवळ बाळगणे तसेच वाहतूक करण्यास प्रतिबंधीत असलेल्या उच्चप्रतीच्या विदेशी मद्याच्या ७००/७५० मिली क्षमतेच्या विविध ब्रँडच्या एकूण १२८ सिलंबद बाटल्या जप्त करण्यात आल्या. दोन्ही कारवाईत मद्य वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेल्या बॅग्ज, मोबाईल जप्त करून ४ लाख ८३ हजार ९५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही कारवाई भरारी पथक क्रमांक १ चे निरीक्षक देवदत्त पोटे, दुय्यम निरीक्षक दिनेश सूर्यवंशी, पी. ए. कोकरे, सहायक दुय्यम निरीक्षक साबळे, जवान अहमद शेख, चंद्रकांत नाईक, भरत नेमाडे, अक्षदा कड, अमर कांबळे, विजय भानवसे यांनी पार पाडली. गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक दिनेश सूर्यवंशी करीत आहेत. अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक तसेच साठवणुकीबाबत काही माहिती मिळाल्यास तात्काळ राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहन निरीक्षक श्री. पोटे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

# ग्राहकाकडून भाजी विक्रेत्यावर चाकूने वार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : भाजी खरेदी करताना झालेल्या वादातून ग्राहकाने भाजी विक्रेत्यावर चाकूने वार केल्याची घटना खडकीतील संजय गांधी भाजी मंडईत घडली. ग्राहकाचा खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी भाजी विक्रेत्याविरुद्ध खडकी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मनोज स्वामी (रा. इंदिरानगर, खडकी) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव




आहे. आरोपीने केलेल्या हल्ल्यात भाजी विक्रेते शौकत बाबामियाँ (वय ३६, रा. दर्गा वसाहत, खडकी) गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शौकत बाबामियाँ यांचा खडकीतील संजय गांधी भाजी मंडईत भाजी विक्री व्यवसाय आहे. आरोपी मनोज स्वामी मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास भाजी खरेदीसाठी आला होता. भाजी खरेदी करताना आरोपी स्वामीने त्यांच्याशी वाद घालून शिवीगाळ केली. बाचाबाचीतून त्याने गाळ्यावरील चाकूने शौकत यांचा गळा आणि चेहऱ्यावर चाकूने वार केला. गंभीर जखमी झालेल्या शौकत यांना मंडईतील भाजी विक्रेत्यांनी रुग्णालयात दाखल केले. आरोपी पसार झाला असून, सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन बेंदगुडे तपास करत आहेत.

# रास्त भाव दुकान परवाना मिळण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे,: जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १३ तालुक्यांमध्ये ४४६ ठिकाणी रास्त भाव दुकान परवाना मंजूर करण्याबाबत जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला असून परवाना मिळण्याच्या अनुषंगाने १५ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या www.pune.nic.in या संकेतस्थळावर हा जाहीरनामा उपलब्ध आहे. या जाहीरनाम्यात सविस्तर अटी व शर्ती, आवश्यक कागदपत्रांचा तपशील, नमुना अर्ज आदीबाबतची माहिती समाविष्ट असून संबंधीत तहसील कार्यालयाच्या पुरवठा शाखेत याबाबत संपूर्ण तपशील व कोरे अर्ज उपलब्ध आहेत.

तहसील कार्यालयात परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी ३० जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२५ असा असून तरी इच्छुकांनी विहित मुदतीत अर्ज करावेत; मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असे जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी पसिद्धी पत्रकान्वये कळवले आहे.